

**पवित्र साक्रामेंताची आराधना**

**(ख्रिस्तराजाचा सोहळा)**

**रविवार दिनांक २१ नोव्हेंबर २०२१**

**विषय:** ख्रिस्तराजाचा सन्मान करुनी, बनूया सहप्रवासी ख्रिस्तसभेचे

विशेष नोंदः (आराधना विधीत अधिक वाचकांना सहभागी करून घेणे.)

**सुरुवातीचे गीत: आम्ही शिष्य**

**धृ.** **आम्ही शिष्य प्रभुचे । एक शरीरी एकच आत्मा**

**त्याच्या प्रतिछायेचे**

१. जीवनात चालताना सैतान वार होईल

जो ख्रिस्त राजा त्याचा नच त्यास काय होईल

आम्ही प्रभुचे प्रभुजी अमुचे त्याच्या प्रतिछायेचे

**प्रास्ताविक:** आज पवित्र ख्रिस्तसभा विश्वाचा राजा प्रभू येशूख्रिस्त याचा सोहळा साजरा करीत आहे. आजच्या दिवशी आपण ख्रिस्तसभेचे लहान लहान घटक एकत्र बनून ख्रिस्तसभेसभेसाठी सहप्रवासी बनलेले आहोत. ज्या प्रभूने आपणाला इथे एकत्र केलेले आहे त्याला नमन करूया व या आराधना विधीत सहभागी होऊया.

**(क्षणभर शांतता ठेवणे)**

प्रत्येक वर्षी ख्रिस्तसभा आगमनकाळ सुरू होण्या अगोदरच्या रविवारी विश्वाचा राजा, प्रभू येशूख्रिस्त यांचा सोहळा साजरा करते. ह्या सोहळ्याद्वारे आपण जे ख्रिस्तसभेचे सहप्रवासी आहोत. त्या आपणास आठवण करून दिली जाते की, जिवंत परमेश्वर हाच खरा सर्वांचा राजा आणि प्रभू आहे. मत्तय लिखित शुभवर्तमानात ४:१० सांगते की, "परमेश्वर तुझा देव ह्याला नमन कर व केवळ त्याचीच उपासना कर." आज आपण सर्वजण सहप्रवासी म्हणून एकत्र आलेलो आहोत. **सिनड २०२१ते २०२३** याचे ध्येय म्हणजे परमेश्वराच्या सर्व लेकरांनी एकत्र चालायचे व एकत्र राहायचे. त्याद्वारे देवाला हवी असलेली ख्रिस्तसभा आपण उभी करू शकतो. पवित्र आत्म्याचा आवाज ऐकूण

श्रद्धेच्या या प्रवासात एकत्र प्रवास करायचा. प्रिय बंधुभगिनींनो, संसारी जीवनात आपण ऐवढे मग्न आहोत की देवाचा आवाज ऐकूण त्याला हवे असलेले राज्य निर्माण करण्यासाठी आपले प्रयत्न असफळ ठरतात. मानवी प्रयत्नापेक्षा दैवी सामर्थ्य हे आपणास ख्रिस्तसभेत अधिक प्रेरक ठरवते. जिथे दोघे किंवा तिघे प्रभूच्या नावाने एकत्र जमतात तिथे पवित्र आत्मा आपणांस प्रेरित करतो. पवित्र आत्म्याचा आवाज ऐकूण ख्रिस्तसभेसाठी उपयुक्त व अस्सल श्रद्धावंत बनावेत म्हणून आजच्या या पवित्र आराधनेत आपण प्रार्थना करूया.

**प्रमुखः** <u>थोडावेळ शांत राहूया. (२ ते ३ मिनिटे)</u>

**देवशब्दः योहान १७:१-११**

येशू वर आकाशाकडे दृष्टी लावून म्हणालाः "हे माझ्या बापा, वेळ आली आहे; पुत्राने तुझा गौरव करावा म्हणून तू आपल्या पुत्राचा गौरव कर. जे तू त्याला दिले आहेत त्या सर्वांना त्याने सार्वकालिक जीवन द्यावे, म्हणून तू मनुष्यामात्रावर त्याला अधिकार दिला आहे. सार्वकालिक जीवन हेच आहे की, तू जो एकच खरा देव त्या तुला आणि ज्याला तू पाठवले त्या येशू ख्रिस्ताला त्यांनी ओळखावे. जे काम तू मला करावयास दिले ते पुरे करून मी पृथ्वीवर तुझा गौरव केला आहे. तर आता हे माझ्या बापा, जग होण्यापूर्वी जो माझा गौरव तुझ्याजवळ होता त्याच्यायोगे तू आपणाजवळ माझा गौरव कर." "जे लोक तू मला जगातून दिले त्यांना मी तुझे नाव प्रगट केले, ते तुझे होते आणि तू ते मला दिले आणि त्यांनी तुझे वचन पाळले आहे. आता त्यांना समजले आहे की, जे काही तू मला दिले आहे ते सर्व तुझ्यापासून आहे. कारण जी वचने तू मला दिली ती मी त्यांना दिली आहेत, ती त्यांनी स्वीकारली; मी तुझ्यापासून आलो हे त्यांनी खरोखर ओळखले आणि तू मला पाठवले असा त्यांनी विश्वास ठेवला. त्यांच्यासाठी मी विनंती करतो. मी जगासाठी विनंती करीत नाही, तर जे तू मला दिले आहेत त्यांच्यासाठी. कारण ते तुझे आहेत. जे माझे ते सर्व तुझे आहे आणि जे तुझे ते माझे आहे आणि त्यांच्या ठायी माझा गौरव झाला आहे. आता ह्यापुढे मी जगात नाही आणि मी तुझ्याकडे येत आहे."

<u>थोडावेळ शांतता ठेवणे (२ ते ३ मिनिटे)</u>

**मनन चिंतन:**

पोप जॉन तेविसावे ह्यांनी जेव्हा इतर पंथियासाठी ख्रिस्तसभेचे प्रवेशद्वार उघडले तेव्हा त्यांनी संपूर्ण जगाला ऐक्याचा संदेश देताना प्रार्थना म्हटली. त्या प्रार्थनेमध्ये ख्रिस्तसभेतील बांधवांमध्ये ऐक्याची, नैतिक मुल्याची, सेवाकार्याची जोपासना व्हावी म्हणून मनोभावे विनंती केली. त्याचप्रमाणे ख्रिस्तसभेपासून जे दुरावलेले, दुःखावलेले व बहकलेले आहेत त्यांनी पित्यामध्ये एक व्हावे यासाठी खास प्रार्थना केली. आपण सर्व देवाची निवडलेली प्रजा आहोत. ख्रिस्तसभेच्या सहप्रवासात एक दुसऱ्याबरोबर चालताना, वाहताना, कार्य करताना एक मनाचे, दिलाचे ख्रिस्ती समुदाय असावेत म्हणून ख्रिस्तसभा आपल्याला आवर्जुन सांगत आहे.

प्रभू येशूने आपल्या शिष्यासाठी पित्याकडे प्रार्थना केली. "देवपित्यामध्ये आपण सर्वांनी एक व्हावे." ख्रिस्तसभेत अजूनही विभाजन आहे. त्यामुळे एकाच देवपित्याची लेकरे म्हणून आपण एकमेकांस ओळखत नाही. आपापसात आपल्यापैकी काही भांडताहेत, अशी दयनीय अवस्था झालेली आहे. पित्यामध्ये एक होण्यासाठी सांप्रत काळात जे संघर्ष, अडचणी, मतभेद, वादविवाद आपल्याला सुसंवादापासून दुरावत आहेत त्यावर मनन चिंतन करणे गरजेचे आहे.

मी ख्रिस्ती कुटुंबामध्ये महत्त्वाचा घटक आहे. माझे कुटुंबही इवलिशी ख्रिस्तसभा आहे. माझ्या कुटुंबाद्वारे मी इतर पंथियाकडे कशाप्रकारे पोहोचू शकेन? मी त्यांना ऐक्याचा, एक दिलाचा, एक मनाचा संदेश कसा देऊ शकेन? ख्रिस्तसभेचा सहप्रवासी म्हणून मी इतरांना बरोबर घेऊन प्रवास करू शकेन का? माझे कुटुंब, शेजारी, माझे लोकं यांच्या सहवासात राहून सुद्धा मी इतरांना आपलेसे करू शकेन का?

(थोडावेळ शांतता ठेवणे)

**गीत: जो आवडतो सर्वांना**

**धृ. जो आवडतो सर्वांना । तोची आवडे देवाला**

१. दीन भुकेला दिसता कोणी । घास मुखीचा मुखी घालुनी
दुःख नेत्रिचे घेता पिऊनी । फोडी पाझर पाषाणाला

२. घेऊनि पंगु आपल्या पाठी । आंधळ्याची होती काठी
पायाखाली त्याच्यासाठी । देव अंथरी निज हृदयाला

३.  जनसेवेचे बांधुनी कंकण । त्रिभुवन सारे घेई जिंकुन

अर्पुण अपुले हृदसिंहासन । नित भजतो जो मानवतेला

(थोडावेळ शांत राहूया. २ ते ३ मिनिटे)

**वाचन: इफिसकरांस पत्र ४:१-६**

जो मी प्रभूमध्ये बंदिवान तो मी तुम्हाला विनवून सांगतो की, तुम्हाला झालेल्या पाचारणास शोभेल असे चाला. पूर्ण नम्रता, सौम्यता आणि सहनशीलता दाखवून एकमेकांना प्रीतीने वागवून घ्या. आत्म्याच्याद्वारे घडून आलेले ऐक्य शांतीच्या बंधनाने राखावयास झटत जा. तुम्हास झालेल्या पाचारणापासून निर्माण होणारी आशा जशी एकच आहे, तसे शरीरही एकच आणि आत्मा एकच आहे. प्रभू एकच, विश्वास एकच, स्नानसंस्कार एकच, सर्वांच्यावर आणि सर्वांमधून आणि सर्वांच्या ठायी असलेला देव जो सर्वांचा पिता तोही एकच आहे.

(वाचनानंतर थोडी शांतता ठेवणे)

**मनन चिंतन:**

इफिसकरांस पत्र हे ख्रिस्ती ऐक्याचे व बंधुत्वाचे पत्र आहे. एकतेमध्ये ख्रिस्तसभेचे सौंदर्य, पावित्र्य आणि सामर्थ्य दिसून येते. कपड्याचा टिकाऊपणा अनेक प्रकारच्या विणलेल्या धाग्यावर अवलंबून असतो. जेवढे धागे एकमेकांशी जवळ विणले जातात, तेवढ्याच प्रमाणात विशिष्ट प्रकारच्या कपड्याला टिकाऊपणा, मजबूती अधिक लाभत असते.

मानवी जीवनाच्या बाबतीत सुद्धा तोच नियम लागू पडतो. आपण जेवढे एकमेकांच्या जवळ असू किंवा जेवढ्या प्रमाणात आपणा सर्वात ऐक्य बळावलेले असते, तेवढे आपण अधिक शक्तीशाली व प्रभावी बनत असतो. ऐक्य मानवी जीवनाला आनंद देते, आनंदी व्यक्ती किंवा कुटुंब किंवा राष्ट्र स्वभावतः ऐक्यावर आधारीत असते. जर त्यांच्यामध्ये विभाजन किंवा फाटाफुट असेल तर आनंदाला वाव मिळत नाही. एकता म्हणजे सेवा, एकता म्हणजे दानधर्म, एकता म्हणजे एकमेकांना समजून घेण्याची अखंड प्रकिया. एकता म्हणजे आपली स्वार्थी किंवा स्वकेंद्रीत वृत्ती बाजूला सारून त्यागासाठी सरसावलेली तीव्र इच्छा होय.

**प्रमुखः** थोडावेळ शांतता ठेवणे.

**गायनः प्रभू मज तव आधार**

**धृ. प्रभू मज तव, आधार हवा रे । साह्याविन तव, जगू कसा रे ।।**

१. द्राक्षवेल तू फांदी तव मी । जीवनरस तू पूरवी सदा रे

२. मस्तक मम तू गात्र तुझी मी । सत्पथ दावी नित्य मला रे

३. तूच असे सर्वस्वही माझे । तुजविण अर्पण करू कुणा रे

४. मालक माझा दास तुझा मी । कर मजला पाईक तुझा रे

५. प्रेमळ पिता माझा म्हणुनी । उत्सुक, मी तव प्रेमाचा रे

**प्रमुखः** आपण सर्वांनी पित्यामध्ये एक व्हावे म्हणून येशूने कळकळीने पित्याकडे प्रार्थना केली. ख्रिस्ताची ऐक्याची प्रार्थना ही शेजारप्रीतीची प्रार्थना आहे. ख्रिस्ताने शिकवलेली प्रार्थना आपणास देवपित्यामध्ये तसेच पवित्र आत्म्यामध्ये ऐक्य साधण्यास आव्हान करीत आहे. आपली ख्रिस्तसभा ऐक्यावर आधारलेली आहे. म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करूया.

**प्रतिसादः हे प्रभो, आम्हाला पित्यामध्ये एक कर.**

१. हे प्रभो, प्रेषितीय कार्यासाठी विभिन्न व्यवसायाच्या लोकांची तू निवड केलीस तरी ते एक झालेत. तुझा ऐक्याचा प्रेषितीय संदेश सर्वत्र जगभर पसरावा हाचा तुझा उदात्त हेतू होता. ख्रिस्तसभेमध्ये अधिकारावर असलेले आमचे परमगुरुस्वामी, सर्व कार्डीनल्ड, बिशप्स, धर्मगुरू व व्रतस्थ यांच्या शिकवणुकीचा सर्वांनी आदर करावा व ऐक्य भावनेने ख्रिस्तसभेसाठी कार्य करावे, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करूया.

२. हे प्रभो, तू पिता, पुत्र व पवित्र आत्मा जसा एक आहेस तसे आम्ही सर्वांनी देवपित्यामध्ये एक व्हावे म्हणून ते स्वर्गीय पित्याकडे प्रार्थना केली. तुझ्यामध्ये अस्तित्वात असलेल्या ऐक्याचा आणि प्रेमाचा वर्षाव आम्हांवर व्हावा, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करूया.

३. हे सर्वशक्तीमान पित्या, ख्रिस्तसभेमध्ये गुण्यागोविंदाच्या वातावरणाची निर्मिती व्हावी तसेच इतर धर्मामध्ये व पंथामध्ये सामंजस्याची भावना निर्माण होण्यासाठी ख्रिस्तसभेचे द्वार उघडण्यास पोप जॉन २३वे ह्यांना तू प्रेरणा दिलीस त्यामुळे त्यांच्यामध्ये आपुलकीची भावना निर्माण झाली. पोप

महाशयाप्रमाणे आम्ही सुद्धा ख्रिस्ती ऐक्यासाठी सहभाग वाढविण्याचा नियमित प्रयत्न करावा, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करूया.

४. परमेश्वराची इच्छा जाणून सर्व लोकांना एकत्रित करण्याची प्रेरणा प्रभूने आपणा सर्वांस द्यावी तसेच पवित्र त्रैक्यात जसे ऐक्य आहे, त्याच प्रकारच्या ऐक्याचा अनुभव आपणा सर्वांस यावा, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करूया.

५. परमेश्वराच्या सर्व प्रजेला ख्रिस्तसभेत सहभाग घेण्यासाठी पाचारण करण्यात आलेले आहे. दैनंदिन जीवनात एकमेकांचे ऐकून सर्वांना एकत्र करण्याची प्रेरणा आपणा सर्वांस पवित्र आत्म्याकडून मिळावी, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करूया.

६. सुवार्ता घोषित करणे हे ख्रिस्तसभेचे प्रमुख कार्य आहे. देवराज्य पसरवित असताना सुवार्ता प्रसाराला प्रथम प्राधान्य देण्याची प्रेरणा आम्हास मिळावी, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करूया.

७. कोरोना महामारीच्या संकटापासून सर्व मानव जातीचं संरक्षण व्हावे. तसेच सर्व आजारी वेदनाग्रस्ताना प्रभूने स्पर्श करून निरोगी आरोग्याचं दान द्यावं, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करूया.

८. थोडावेळ शांत राहून वैयक्तिक हेतूसाठी आपण प्रार्थना करूया.

**प्रमुखः** आपण सर्वजण देवाची मुलं आहोत. देवाला अब्बा, बापा या नावाने हाक मारण्यासाठी आपणास त्याने शिकविले आहे. प्रभूने शिकवलेली प्रार्थना आपण सर्वजण म्हणूया.

**आमच्या स्वर्गीय बापा**........

**अंतीम गीत: श्री येशू**

श्री येशू भगवान त्याचा, करूया जयजयकार
विघ्नापासुनि तारि जगाला, केवळ नामोच्चार
जयजयकार, जयजयकार, जयजयकार

---

**फा. लेस्ली माल्या - संचालक, मुक्तिसागर प्रबोधन केंद्र, उत्तन**
**उपासना कक्ष, पोस्ट - उत्तन, भाईंदर (प.), जि. ठाणे - ४०११०६**
**फो. ०२२ - २८४५ ०१२१/ मो. ९९२०७९०३१९**

---